निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
रविवार
११ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३१७ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# संत वामनभाऊ महाराजांचे विचार पिढ्यान्पिढ्या मार्गदर्शक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## संत वामनभाऊ महाराज यांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त कळशारोपण कार्यक्रम



**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/प्रतिनिधी/** समाजाला अध्यात्म, सदाचार आणि एकोप्याचा मार्ग दाखवणारे नाथ परंपरेतील महान संत वामनभाऊ महाराज यांचे विचार काळाच्या ओघातही अधिकच सुसंगत ठरत असून, त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश पिढ्यान्पिढ्या समाजाला मार्गदर्शन करत राहतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

संत वामनभाऊ महाराजांच्या ५० व्या, सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, गडाचे महंत विठ्ठल महाराज, आमदार धनंजय मुंडे, सुरेश धस, मोनिका राजळे, आमदार योगेश क्षीरसागर, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, भीमराव धोंडे, विक्रमानंद शास्त्री, स्वामी विश्वेश्वरानंदजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संत वामनभाऊ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी मी येथे आलो आहे. हे निमंत्रण मुख्यमंत्र्याला नसून, संत वामनभाऊ महाराजांच्या एका भक्ताला आणि गहिनीनाथ गडाच्या सेवकाला विठ्ठल महाराजांनी दिलेले आहे, या भावनेतून मी येथे उपस्थित आहे.

नाथ परंपरेतील महान संत आणि शंकराचा अवतार मानले जाणारे संत वामनभाऊ महाराज हे समाजाला दिशा देणारे सद् गुरु होते. दऱ्या-खोऱ्यांतून प्रवास करत त्यांनी भागवत पंथाचा प्रचार केला आणि समाजात एकोप्याचा संदेश दिला. मन शुद्ध असेल तर आचरण शुद्ध होते हा विचार त्यांनी समाजमनात रुजवला. त्यांच्या उपदेशामुळे चोरसुद्धा चोरी सोडून माळकरी झाले, ही त्यांची अलौकिक किमया होती, असे त्यांनी सांगितले.

संत वामनभाऊ महाराजांना वाचासिद्धी होती, असे सांगितले जाते. त्यांच्या कीर्तनातून आणि विचारातून समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत अध्यात्म पोहोचले. कितीही पिढ्या बदलल्या तरी त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश आजही तितकेच महत्त्वाचे आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

प्रसाद वितरणाची परंपरा हे संत वामनभाऊ महाराजांचे मोठे वैशिष्ट्य असून, जिथे-जिथे सप्ताह होतो तिथे भाविकांसाठी पोटभर जेवणाची व्यवस्था केली जाते. पुढील सप्ताहासाठी विविध गावांतून मोठ्या प्रमाणावर मागणी असणे ही संत वामनभाऊ महाराजांच्या कृपेची साक्ष असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी शासनाच्या योजनेअंतर्गत विविध कामे हाती घेण्यात आली असून ती टप्प्याटप्प्याने पूर्ण होत आहेत.

पंढरपूर येथे आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, पालखी मार्गाच्या विकासासाठीही लवकरच काम करण्यात येईल, असे आश्वासन देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर गहिनीनाथ गडाचा एक अनुयायी म्हणून येथील सर्व विकासकामांची जबाबदारी लोकप्रतिनिधींसह मिळून पार पाडली जाईल. दरवर्षी संधी मिळेल तेव्हा गहिनीनाथ गडावर येऊन संत वामनभाऊ महाराजांचा आशीर्वाद घेत राहीन, असे मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ महाराजांनी कठीण काळात माणसाला माणूस बनवण्याचे संस्कार समाजाला दिले. सत्य, एकोपे आणि सेवाभावाचे हे संस्कार आजही महाराष्ट्रभर जिवंत आहेत. कष्टकरी, गरीब आणि वंचित समाज वामनभाऊ महाराजांचे विचार विसरलेला नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून गहिनीनाथ गडाच्या विकासाला भव्य स्वरूप मिळत असून, हे कार्य भाविकांच्या श्रद्धेला साजेसे ठरत आहे. सामान्य माणसाच्या श्रद्धास्थानांच्या विकासासाठी केलेले हे कार्य निश्चितच लोकांचा आशीर्वाद मिळवून देणारे आहे असा उल्लेख त्यांनी केला.

यावेळी भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.

# आरोग्य विभागाअंतर्गत बदल्या, पदोन्नतीसाठी ‘एसएचएसआरसी’चे मूल्यांकन प्रमाण मानावे

## आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या सूचना

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या, पदोन्नती करताना ‘राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र’ (एसएचएसआरसी) च्या प्रणालीनुसार कामगिरीवर आधारित मूल्यांकन अहवालानुसार पारदर्शकपणे कार्यवाही करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या. या संदर्भात परिषद सभागृह, मंत्रालय येथे नवीन तांत्रिक कोर्सेस, नवीन प्रशिक्षणांचे नियोजन, वैद्यकीय अधिकारी, नर्सेस आणि तांत्रिक कर्मचारी यांचे परराज्यात, परदेशातील शैक्षणिक दौऱ्यांचे नियोजन, नवीन प्रशिक्षण नियोजन, सेवानिवृत्त संचालक, आरोग्य सेवा यांनी केलेल्या दौऱ्यातील निरीक्षण त्या अनुसार करावयाची कार्यवाही, ‘एसएचएसआरसी’ च्या जागेचे नूतनीकरण, पदभरती सद्यस्थिती, SHSRC निधी उपलब्धता आदी विषयांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी या सूचना करण्यात आल्या.

केंद्र सरकारची ‘राष्ट्रीय आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र (एनएचएसआरसी) नवी दिल्ली’ ही संस्था देश पातळीवर आरोग्य विभागास तांत्रिक सहकार्य करते. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात ‘राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे’ ही संस्था कार्यरत आहे. राज्याच्या आरोग्य विभागाची गुणवत्ता वाढ, आरोग्यविषयक संशोधन व तांत्रिक सहकार्य या संस्थेच्या वतीने देण्यात येते. आरोग्य विभागामार्फत एसएचआरसी संस्था राज्यातील सर्व जिल्हे व महापालिका क्षेत्रातील आरोग्य संस्थांचे व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कामकाजाचे मूल्यांकन करते. तसेच त्यांचे कामगिरीवर आधारित गुणवतेनुसार दरमहा (रँकिंग) गुणानुक्रम देत असते. या रँकिंग प्रणालीमध्ये प्रशासकीय, तांत्रिक व वित्तीय बाबींचा समावेश असतो. यापुढे सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांच्या बदली, बढती करताना, कामगिरीवर आधारित मूल्यांकन (रँकिंग) प्रणालीच्या अहवालानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्यमंत्री यांनी दिल्या आहेत. या निर्णयामुळे आरोग्य सेवेचे कामकाज अधिक पारदर्शक होईल.

राज्यातील आरोग्य कार्यक्रम राबवण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध होत असतो. या निधीबरोबरच नागरिकांना आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे देण्यासाठी ‘कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सबीलिटी (सीएसआर)’ माध्यमातूनही निधी उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विभागाने सीएसआर देणाऱ्या संस्थांना प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या.

राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत असलेले जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (डीपीएम) व जिल्हा लेखा व्यवस्थापक (डीएएम), एनएचएम सल्लागार व एनएचएम कार्यक्रम अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील आरोग्य संस्थांना नियमित भेटी द्याव्यात. भेटीचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा. असे निर्देश आरोग्यमंत्री आबिटकर यांनी दिले,

यावेळी पदभरती, मानव संसाधन सुसूत्रीकरण, अधिकाऱ्यांनी भेटी दिलेल्या संस्थाच्या बाबतचे सादरीकरण करण्यात आले.

बैठकीस आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रवींद्रन, आरोग्य विभागाच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालक राजेंद्र भालेराव, सह संचालिका डॉ. सुनीता गोल्हाईत, सह संचलिका डॉ. सरिता हजारे, माजी महासंचालक सल्लागार डॉ. सुभाष साळुंखे, डॉ. मोहन जाधव व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# सुरक्षित ऑनलाईन आर्थिक व्यवहारासाठी ग्राहकांची सतर्कता गरजेची



**– सहायक महाव्यवस्थापक पंकज बच्छाव**
**– ‘आर्थिक व्यवहाराविषयी जनजागृती’ सत्राचे मंत्रालयात आयोजन**

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** हल्ली ऑनलाईन आर्थिक व्यवहारांचे प्रमाण झपाट्याने वाढत असून ऑनलाईन आर्थिक व्यवहारांतील अपप्रकार, फसवणुकीच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. अशा प्रकारचे आर्थिक नुकसानीचे गैरप्रकार टाळण्यासाठी ग्राहकांनी ऑनलाईन आर्थिक व्यवहारात खबरदारी घेत सर्तकतेने सुरक्षित व्यवहार करणे गरजेचे असल्याचे भारतीय रिझर्व्ह बँकेचे सहायक महाव्यवस्थापक पंकज बच्छाव यांनी सांगितले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या वतीने मंत्रालयात आयोजित ‘आर्थिक व्यवहाराविषयी जनजागृती’ सत्रात बच्छाव बोलत होते. यावेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक गोविंद अंहकारी, रिझर्व्ह बँकेच्या व्यवस्थापक शिल्पा छेडा यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सहायक महाव्यवस्थापक बच्छाव म्हणाले की, खबरदारी घेतल्यास ऑनलाईन आर्थिक व्यवहार सुरक्षितपणे करता येऊ शकतात. यादृष्टीने ग्राहकांनी कायम आपले ओटीपी, पिन, पासवर्ड किंवा सीव्हीव्ही क्रमांक दुसऱ्या कोणालाही सांगू नयेत. तसेच, बँक किंवा कोणतीही अधिकृत संस्था फोन, मेसेज किंवा ई-मेलद्वारे अशी माहिती कधीही मागत नाही. अशा प्रकारचा फोन किंवा दूरध्वनी आल्यास तो फसवणुकीचा असण्याची शक्यता असते हे लक्षात घेऊन माहिती देऊ नये. बँकिंग, यूपीआय, वॉलेट, ऑनलाईन खरेदी अशा व्यवहारांमध्ये थोडासा निष्काळजीपणा ग्राहकांना मोठ्या आर्थिक नुकसानीकडे नेऊ शकतो. त्यामुळे ऑनलाईन व्यवहार करताना खबरदारी घेणे आवश्यक आहे.

आपल्या सुरक्षित आर्थिक व्यवहारांसाठी नेहमी ग्राहकांनी अधिकृत ॲप्स व संकेतस्थळांचाच वापर करावा. ॲप डाउनलोड करताना गुगल प्ले स्टोअर किंवा अधिकृत ॲप स्टोअरचाच वापर करावा. संशयास्पद लिंकवर क्लिक करणे टाळावे. ई-मेल किंवा मेसेजमधील लिंक उघडण्यापूर्वी ती अधिकृत आहे का याची खात्री करणे गरजेचे आहे. ऑनलाईन व्यवहारासाठी सहज लक्षात न येणारा मोठा, संमिश्र पासवर्ड वापरणे आणि तो नियमितपणे बदलणे महत्त्वाचे आहे. एकाच पासवर्डचा अनेक ठिकाणी वापर टाळावा. शक्य असल्यास दोन स्तरांची सुरक्षा सक्रिय ठेवावी, असे सहायक महाव्यवस्थापक बच्छाव यांनी सांगितले.

सार्वजनिक वाय-फाय नेटवर्कवर बँकिंग किंवा आर्थिक व्यवहार कटाक्षाने टाळावेत. अशा नेटवर्कवरून माहिती चोरीला जाण्याचा धोका अधिक असतो. व्यवहारानंतर खात्याचा तपशील, मेसेज व ई-मेल नियमित तपासणे गरजेचे आहे. फसवणुकीची शंका आल्यास किंवा पैसे चुकीने वजा झाल्यास तत्काळ बँकेशी संपर्क साधावा तसेच सायबर क्राईम हेल्पलाईनवर तक्रार नोंदवावी. लवकर तक्रार केल्यास नुकसान टाळण्याची शक्यता वाढते,असे बच्छाव यांनी सांगितले. व्यवस्थापक शिल्पा छेडा म्हणाल्या की, भारतीय रिझर्व्ह बॅंकेमार्फत ग्राहकांच्या सेवेकरिता तक्रार निवारण सुविधा उपलब्ध आहे. जर तुमची बँक ग्राहकांना त्यांच्या बँक खात्याशी संबंधित तक्रारींबाबत समाधानकारक उपाय देत नसेल किंवा तक्रारींच्या अनुषंगाने तत्परतेने ठोस कारवाई करत नसेल, तर अशा प्रकरणात संबंधित ग्राहक रिझर्व्ह बँकेकडे आपली तक्रार नोंदवू शकतात. ग्राहक आपली तक्रार ईमेल किंवा पत्राद्वारे दाखल करु शकतात. या जनजागृती सत्रास मंत्रालयातील विविध विभागाचे अधिकारी,कर्मचारी प्रत्यक्ष तसेच ऑनलाईन उपस्थित होते.

## संक्षिप्त

### आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी सर्वसमावेशक प्रशिक्षणाचे नियोजन प्राधान्याने करा - मंत्री प्रकाश आबिटकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** सार्वजनिक आरोग्य यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबतचा सर्वसमावेशक आराखडा तयार करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

आरोग्यमंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील समिती सभागृहात बैठक झाली. या बैठकीला आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रवींद्रन, आरोग्यसेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत व डॉ. सरिता हजारे उपस्थित होते. तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत नियुक्त सल्लागार डॉ. सुभाष साळुंखे, (से.नि. महासंचालक, आरोग्य सेवा) आणि डॉ. मोहन जाधव, (से.नि. संचालक आरोग्य सेवा) यांनी यावेळी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा मुद्दा अधोरेखित केला. आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले की, राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा स्तरावरील आरोग्य संस्थांमधील कर्मचाऱ्यांनी प्रभावी काम करावे, यासाठी त्यांनी आवश्यक प्रशिक्षण पूर्ण करावे. आपले प्रशिक्षण व प्रशिक्षण संस्था इतक्या प्रभावी सर्वसमावेशक असाव्यात की परराज्यांतील कर्मचाऱ्यांनीही या ठिकाणी प्रशिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त करावी.

तालुका आरोग्य अधिकारीपदास प्राधान्याने बळकटी देण्यावर भर देण्यात येत असून तालुका आरोग्य अधिकारी हा राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत महत्वाचा असुन, प्रशिक्षण कार्यक्रमात तालुका आरोग्य अधिकारी (टीएचओ) आणि समुदाय आरोग्य अधिकारी (सीएचओ) यांचा आवर्जून समावेश करावा. पद संवर्गनिहाय प्रशिक्षणाचा सविस्तर आराखडा तयार करुन एक महिन्याच्या आत मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# नांदेड येथील ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रम ऐतिहासिक करावा मान्यवरांकडून पत्रकार परिषदेत आवाहन




**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/प्रतिनिधी/** ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी सर्व समाजातील नागरिकांनी उपस्थित राहून हा कार्यक्रम ऐतिहासिक करावा, असे आवाहन पत्रकार परिषदेत मान्यवरांनी केले.

सचखंड पब्लिक स्कूल येथील गुरु ग्रंथ साहिब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेस जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा अबचलनगर नांदेडचे मुख्य जथ्थेदार संत बाबा कुलवंत सिंगजी यांच्यासह भाई जोसिंदर सिंगजी, भाई राम सिंगजी, भाई कश्मीर सिंगजी, भाई गुरमीत सिंगजी, संत ज्ञानी हरनाम सिंग जी तसेच गुरुद्वारा लंगर साहिबचे संत बाबा बलविंदर सिंगजी, समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, सरजीत सिंग गिल, राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, महेंद्र रायचूरा (धर्म जागरण क्षेत्रीय प्रमुख पश्चिम क्षेत्र ) महंत सुनिल महाराज, महंत जितेंद्र महाराज, राष्ट्रीय बंजारा परिषदेचे संस्थापक किशनराव राठोड आदी उपस्थित होते.

राज्य शासनाचा अल्पसंख्याक विकास विभाग, राज्यस्तरीय समिती, शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीकी, उदासीन व भगत नामदेव (वारकरी संप्रदाय) व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रमाचे आयोजन नांदेड शहरातील मोदी मैदान येथे करण्यात आले आहे.

जथ्येदार साहेब भाई कुलवंत सिंग जी, संत ज्ञानी हरनाम सिंग जी यांनी ‘हिंद-दी-चादर’ या कार्यक्रमाचे महत्त्व विषद करून शीख व इतर समाजाचे कार्यक्रमाच्या अनुषंगाने असणाऱ्या योगदानाबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासन करत असलेल्या महत्त्वपूर्ण सहकार्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. भाविकांनी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले की, महाराष्ट्र शासन व विविध समाज यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या ‘हिंद दी चादर’ कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सध्या तयारी वेगाने सुरु आहे. भाविकांना कुठल्याही प्रकारची अडचण भासणार नाही याची पूर्णत: काळजी घेतली जाईल. कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी विविध २५ समित्यांची स्थापना करण्यात आली असून समित्यांवर सोपविलेल्या कामाप्रमाणे नियुक्त अधिकारी व कर्मचारी दक्षतेने कामे करीत आहेत. भाविकांसाठी जिल्हानिहाय पार्किंगची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून निवासासाठी शहरातील शाळा, महाविद्यालये व मोकळ्या जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वाहतूक व्यवस्थेचे सुसूत्र नियोजन करण्यात आले असून आवश्यक वाहनांची व्यवस्था देखील करण्यात येत आहे. नांदेड हे रेल्वेमार्गावर असल्याने रेल्वे विभागाच्या सहकार्याने अधिकाधिक भाविकांना रेल्वे सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. लंगर, निवास, पाणी व वाहतूक व्यवस्थेचा दैनंदिन आढावा घेतला जात असून आरोग्य सेवांसाठी विविध रुग्णालयांमार्फत वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणार आहेत. कार्यक्रमस्थळी विविध आरोग्य स्टॉल उभारण्यात येणार आहेत. कार्यक्रमाच्या प्रचार-प्रसिद्धीसाठी विविध शाळांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून १५ जानेवारीपासून प्रभातफेऱ्या काढण्यात येणार आहेत.

राज्यस्तरीय समिती समन्वयक रामेश्वर नाईक म्हणाले की, शहिदी समागम केवळ धार्मिक कार्यक्रम नसून तो सर्वधर्म समभाव, मानवता, संविधानिक मूल्ये व सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा ऐतिहासिक उपक्रम आहे. या शहिदी समागम उपक्रमांची सुरुवात नागपूर येथे यशस्वीरित्या पार पडलेली असून त्याच उपक्रमाचा पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणून नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी दोन दिवसांचा भव्य शहिदी समागम कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम ऐतिहासिक करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे व कार्यक्रमाची मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसिद्धी करून नांदेड जिल्ह्याच्या नावलौकिकात भर घालावी, असेही नाईक म्हणाले.

# मानवी तस्करी : आधुनिक गुलामगिरीविरुद्ध माणुसकीचा लढा



दरवर्षी ११ जानेवारी रोजी साजरा होणारा 'राष्ट्रीय मानवी तस्करी जागरूकता दिन' हा केवळ एखादा स्मरणदिन नसून तो समाजाच्या सामूहिक अंतरात्म्याला जागे करणारा एक महत्त्वाचा प्रसंग आहे. स्वातंत्र्य, समानता आणि मानवी हक्क यांची मूल्ये जपत पुढे चालणाऱ्या आधुनिक जगात आजही लाखो स्त्री-पुरुष आणि मुले खरेदी-विक्रीच्या वस्तूसारखी वागवली जातात, ही बाब आपल्या सामाजिक प्रगतीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करते. मानवी तस्करी ही काही गुन्हेगारांची विकृती नसून ती दारिद्र्य, विषमता, बेरोजगारी, स्थलांतर, लिंगभेद, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक असुरक्षितता या सर्व घटकांच्या परस्पर संबंधातून निर्माण झालेली खोलवर रुजलेली सामाजिक समस्या आहे. म्हणूनच या प्रश्नाकडे केवळ गुन्हेगारी स्वरूपात न पाहता समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते.

मानवी तस्करी म्हणजे एखाद्या व्यक्तीला फसवणूक, आमिष, धमकी, दबाव किंवा हिंसेच्या माध्यमातून तिच्या इच्छेविरुद्ध एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेऊन तिच्याकडून शोषणात्मक काम करून घेणे. हे शोषण लैंगिक असू शकते, जबरदस्तीची मजुरी असू शकते, घरगुती गुलामगिरी, बालमजुरी, भीक मागणे, अवयव विक्री किंवा सक्तीच्या विवाहाच्या स्वरूपातही ते आढळते. या प्रक्रियेत माणसाचे स्वातंत्र्य, ओळख आणि मानवी प्रतिष्ठा पूर्णपणे नष्ट होते. समाजशास्त्र स्पष्टपणे सांगते की ज्या समाजात सत्ता, संसाधने आणि संधी काही मोजक्या गटांकडे केंद्रीत असतात, तिथे दुर्बल घटकांचे शोषण अपरिहार्यपणे वाढते आणि मानवी तस्करीसारख्या अमानवी प्रथा बळावतात.

भारतीय समाजरचना ही ऐतिहासिकदृष्ट्या जात, वर्ग, लिंग आणि प्रदेश यांच्या आधारे विभागलेली आहे. या विषम सामाजिक रचनेमुळे अनेकांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या समान संधी मिळत नाहीत. ग्रामीण भागातील दारिद्र्य, शेतीतील अनिश्चित उत्पन्न, आदिवासी भागातील विकासाचा अभाव आणि शहरी झोपडपट्ट्यांतील असुरक्षित जीवन यामुळे लाखो लोक रोजीरोटीच्या शोधात स्थलांतर करतात. या स्थलांतराच्या प्रवासातच दलाल आणि तस्कर गरीब व असहाय लोकांना चांगल्या नोकरीचे, शिक्षणाचे किंवा सुरक्षित आयुष्याचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढतात. विशेषतः महिला, मुले, आदिवासी आणि स्थलांतरित कामगार यांच्याकडे माहिती, कायदेशीर संरक्षण आणि सामाजिक पाठबळ कमी असल्याने ते अधिक असुरक्षित ठरतात.

स्त्री आणि मुलींची तस्करी ही मानवी तस्करीचे सर्वात क्रूर रूप मानले जाते. पितृसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीच्या शरीराकडे आणि श्रमाकडे वस्तू म्हणून पाहण्याची प्रवृत्ती अजूनही खोलवर रुजलेली आहे. याच मानसिकतेतून लैंगिक तस्करीला खतपाणी मिळते. अनेक मुली प्रेमजाळे, खोटी लग्ने, नोकरीचे आमिष किंवा थेट अपहरणाद्वारे वेश्याव्यवसायात ढकलल्या जातात. त्यांच्या आयुष्यावर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक पातळीवर खोल जखमा उमटतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही केवळ काही गुन्हेगारांची कृत्ये नसून स्त्रीला दुय्यम स्थान देणाऱ्या सांस्कृतिक रचनेचे अपयश आहे.

बाल तस्करी ही तर समाजाच्या नैतिक अधःपतनाची परिसीमा आहे. शिक्षण, संरक्षण आणि प्रेमाचा हक्क असलेल्या मुलांना बालमजुरी, भीक मागणे, घरगुती कामे किंवा लैंगिक शोषणासाठी वापरले जाते. अनेक वेळा अत्यंत गरीब कुटुंबेही आपल्या असहायतेमुळे दलालांच्या फसवणुकीला बळी पडतात. समाजशास्त्र सांगते की मुलांचे शोषण हे सामाजिक सुरक्षा जाळ्याच्या अपयशाचे द्योतक आहे. जेव्हा राज्य आणि समाज कुटुंबांना मूलभूत सुविधा पुरवण्यात अपयशी ठरतात, तेव्हा मुले तस्करीच्या जाळ्यात अडकतात.

कामगार तस्करी आणि जबरदस्तीच्या श्रमांची समस्या ही आधुनिक भांडवली अर्थव्यवस्थेची काळी बाजू आहे. असंघटित क्षेत्रात काम करणारे लाखो कामगार कर्ज, आमिष किंवा फसवणुकीमुळे गुलामासारखे राबवले जातात. वीटभट्ट्या, बांधकाम, शेती, कारखाने आणि घरगुती कामांमध्ये त्यांना अत्यंत अमानुष परिस्थितीत काम करावे लागते. जागतिकीकरणामुळे स्वस्त श्रमांची मागणी वाढली असून त्याचा फायदा तस्कर घेतात. समाजशास्त्रीयदृष्ट्या हे आर्थिक विषमतेचे आणि कामगारांच्या दुर्बलतेचे द्योतक आहे.

डिजिटल युगात मानवी तस्करीचे स्वरूपही बदलले आहे. सोशल मीडिया, ऑनलाईन जाहिराती आणि बनावट भरती संस्थांच्या माध्यमातून तरुणांना नोकरी, मॉडेलिंग किंवा परदेशी शिक्षणाचे आमिष दाखवले जाते आणि नंतर त्यांचे शोषण केले जाते. त्यामुळे आज जागरूकता ही केवळ भौतिक जगापुरती मर्यादित न राहता डिजिटल अवकाशातही तितकीच महत्त्वाची आहे. माहितीची असमानता आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर हे नव्या प्रकारच्या सामाजिक शोषणाचे माध्यम ठरत आहेत.

भारतात मानवी तस्करीविरोधात कायदे आणि योजना अस्तित्वात असल्या तरी अंमलबजावणीतील त्रुटी मोठे आव्हान ठरतात. पोलिस, न्यायव्यवस्था आणि सामाजिक संस्थांमध्ये समन्वयाचा अभाव, तसेच पीडितांविषयी असलेला सामाजिक कलंक, पुनर्वसनाच्या प्रक्रियेला अडथळा आणतो. तस्करीतून सुटलेल्या व्यक्तींना समाजात पुन्हा स्वीकार मिळणे कठीण जाते, आणि त्यामुळे अनेकदा ते पुन्हा शोषणाच्या चक्रात अडकतात.

या सर्व पार्श्वभूमीवर राष्ट्रीय मानवी तस्करी जागरूकता दिनाचे महत्त्व अधिक ठळक होते. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की मानवी प्रतिष्ठेचे रक्षण ही केवळ सरकारची नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. गरिबी निर्मूलन, गुणवत्तापूर्ण शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि कामगार हक्कांचे संरक्षण ही मानवी तस्करीविरोधातील सर्वात प्रभावी साधने आहेत. शाळा, महाविद्यालये, प्रसारमाध्यमे आणि स्वयंसेवी संस्था यांनी या विषयावर सातत्याने जनजागृती करणे आवश्यक आहे.

समाजशास्त्र आपल्याला शिकवते की मानवी तस्करी ही वेगळी समस्या नसून ती आपल्या सामाजिक रचनेतील दोषांचे प्रतिबिंब आहे. म्हणून तिचे उच्चाटन करायचे असेल तर आपल्याला अधिक समतावादी, संवेदनशील आणि न्याय्य समाज घडवावा लागेल. ११ जानेवारी हा दिवस आपल्याला केवळ जागरूक करत नाही, तर कृतीसाठी प्रेरित करतो. कारण ज्या समाजात माणूस माल म्हणून विकला जातो, त्या समाजात कोणाच्याही स्वातंत्र्याला अर्थ राहत नाही. मानवी तस्करीविरुद्धची लढाई म्हणजे माणुसकीच्या रक्षणाची लढाई आहे, आणि ती आपणा सर्वांची आहे.

– **डॉ. राजेंद्र बगाटे**, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल- bagate. rajendra5gmail.com

---

# श्वान नाही, बिबट्या पकडणे आहे?


आज श्वान पकडण्याचं काम शिक्षकांना सोपविण्यात येत आहे. उद्या कदाचित बिबट्याही पकडायला लावणार. कारण बिबट्याचा सध्या महाराष्ट्रात वावर जास्त वाढलाय. तो लोकांना त्रास देवू लागलाय आणि त्याचीही संख्या आता झपाट्यानेच वाढूही लागली आहे.

अलिकडील काळात जेवढीही कामं शिक्षकांना सोपवण्यात येत आहेत. ती कामं त्याला मरणयातनाच देणारी आहेत. ज्यातून केव्हा मरण प्राप्त होईल याची शक्यता नाकारता येत नाही. जसं श्वान पकडणं. आताचा शिक्षक हा शासनाच्या अशा स्वरूपाच्या सर्वच कामानं बेजार झालेला असून तो मानसिक तणावातही जगू लागला आहे. त्यातच तो निवृत्त होताच तो जास्त दिवसही जगू शकत नाही. असं का होतं? असं होतं, त्यानं शिक्षकी जीवनात भोगलेल्या यातनेतून. त्या यातनांचे जंतू त्याच्या अंगात भिनलेले असतात. जे कर्तव्य करीत असतांना तेवढ्या स्वरुपात त्रास देत नाहीत. परंतु जसा शिक्षक निवृत्त होतो. तसे ते जंतू आपलं डोकं काढून बाहेर निघतात. वळवळतात व शिक्षकांनाच छळायला लागतात. ज्यातून त्याचं निवृत्तीनंतरचं आयुष्य उध्वस्त होतं व ते आजाराच्या विळख्यात शिरतात वा ते निवृत्तीनंतर लगेच अकाली स्वरुपात मरण पावतात. हीच वास्तविकता आहे व ही वास्तविकता नाकारता येत नाही.

शिक्षक........ एक समाजातील जबाबदार घटक. कोणतंही जबाबदारीचं काम द्या. ते शिक्षक पुर्ण करणारच. कारण जेवढा तो जबाबदारी स्विकारतो. तेवढाच तो इमानदारीनं कामंही करतो. कोणत्याही कामात दिरंगाई किंवा चालढकलपणा करीत नाही.

काम...... शिक्षकांचं काम आहे, शिकवणं. जे काम तो नित्यनेमानं करीत असतो. ज्या कामात त्याला तत्परता आहे. जे काम तो निष्णांतपणे करु शकतो. ज्या कामात त्याला ते काम करतांना उत्सुकता वाटते. याव्यतिरिक्त त्याला सरकार आणखी बरीच कामं सोपवतात. मग मतदानात बी एल ओचं काम असो. जनगणना असो, निवडणुकीत निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याचं काम असो वा हागणदारीमुक्त गाव करण्याचं काम असो. कोरोना भागवायचं काम असो. शासनाला माहीत आहे की शिक्षकांना ते काम सोपवल्याशिवाय ते काम तडीसच जात नाही. जसं हागणदारीमुक्त गाव करणं.

हागणदारीमुक्त गाव...... मागे शासनानं याबाबतीत बरीच जनजागृती केली. सरपंचामार्फत गावाला समजावलं. लोकांनी शौचालय बांधावं, याबाबत बरेच वेळा लोकांना विनंती केली. अनुदानही दिलं. परंतु काहीच फायदा झाला नाही. लोकांनी शौचालयाचे सरकारमार्फत आलेले अनुदान लाटले. परंतु शौचालय बनवले नाही. त्यानंतर शासनाचं लक्ष गेलं शिक्षकांकडे. शिक्षकांशिवाय हे काम तडीस जाणार नाही, असं शासनाला वाटलं. त्यानंतर आदेश निघाला. एका शाळेनं एक गाव दत्तक घ्यावं. त्या संपुर्ण गावात शौचालय बनायला हवं. त्यासाठी केवळ लोकांना विनंतीच करावी असे नाही तर ते शौचालय बांधण्यासंदर्भात अनुदान मिळवून देण्यासाठी लोकांना मार्गदर्शन करावं आणि एखाद्याला अनुदान मिळत नसेल. कागदपत्राची अपुर्णता असेल तर त्याला आपल्या जवळील पैसे देवून त्याला शौचालय बांधण्यास प्रोत्साहित करावं वा त्यांना शौचालय बांधून द्यावं.



तो आदेशच होता. सरकारचा आदेश आणि शिक्षक सरकारच्या तिजोरीतून वेतन स्वरुप पैसे घेत असल्यानं त्यांना ते पाळणं आवश्यक होतं. त्यातच ते ब्रीद पुर्ण न झाल्यास कारवाई देखील होती शिक्षकांवर. शेवटी सरकारी आदेश पाहून शिक्षक कामाला लागले. त्यानंतर तयार झालं प्रारुप. गावागावात शिक्षक फिरले. त्यांनी गावात सर्वेक्षण केलं व ज्या घरी शौचालय नव्हते. त्यांना अनुदान मिळवून दिलं. तसंच ज्यांना अनुदान मिळत नव्हतं. त्यांना गावातील काही श्रीमंत दानदात्यांकडून पैसा गोळा करुन व काही आपल्याजवळील पैसे टाकून शौचालय बांधून दिलं. त्याचे कॉन्ट्रॅक्ट स्वतः शिक्षकांनी कॉन्ट्रॅक्टदाराला दिले. आज अशी स्थिती आहे की गावागावात आज शौचालये आहेत. कोणीच गावातील गावाच्या बाहेरील रस्त्यावर उघड्यावर शौचालयासाठी बसत नाही व कोणालाच रात्री अपरात्री शौचालयास जातांना भीती वाटत नाही. त्यातच आता शौचालयास जातांना लांडग्या, बिबट्याची भीती वाटत नाही. याचाच अर्थ असा की शिक्षकांच्या माध्यमातून शौचालयाचा प्रश्न सुटला. त्यानंतर दुसरा प्रश्न निर्माण झाला होता, कोरोनाच्या काळातील. कोरोना काळात कोरोना संदर्भात व्यवस्था करायची होती. कोरोनावर मात करायची होती. त्यातच कोरोनाला पळवायचे होते. जनजागृती होत होती. परंतु काहीच फायदा होत नव्हता. त्यातच मुलांचं शिक्षणही सांभाळायचं होतं. अशातच सरकारचं लक्ष गेलं शिक्षकांकडे. आठवले सावित्रीबाई फुलेंच्या काळातील दिवस. सावित्रीबाई फुले एक शिक्षिका. परंतु ज्यावेळेस पुण्यात प्लेग पसरला होता. तेव्हा सावित्रीबाईनं शिक्षकीपणा सोडून पुढे येवून काम केलं. तिनं प्लेगच्या रुग्णांना मदत केली. ती प्लेगनं मरण पावली. परंतु प्लेग तर पळाला. आपल्याला काय करायचंय. शिक्षक मरो की जगो. आपल्याला कोरोनावर मात करायचीय. कोरोना पळवायचाय. तसा विचार करुन शासनानं कोरोना काळातही शिक्षकांना कामावर जुंपलं. त्यांची रस्त्यारस्त्यांवर, नाकानाक्यांवर ड्युटी लावली. शिक्षकांच्या मृत्यूचा विचार केलाच नाही. ज्यात कितीतरी शिक्षक मरण पावले कोरोना होवून. शिक्षक गेले. परंतु कोरोना पळालाय. ही गोष्ट गड आला पण सिंह गेल्यासारखी झाली.

शिक्षक हा जबाबदार घटक. जेव्हा म्हणाल, तेव्हा तो कोणत्याही स्वरुपाची जबाबदारी स्विकारायला तयार. त्यातच त्याला कोणतंही काम द्या. तो आपल्या प्राणाची पर्वा करीत नाही. म्हणूनच त्यांचेकडे देश घडविण्याचं कार्य सोपवलंय. तो आपल्या शाळेतील वर्गखोल्यातून आपल्या विद्यार्थ्यांना घडवून सक्षम बनवतो. त्याला देशाचा समृद्ध नागरीक बनवतो. त्याला काही होवू नये म्हणून आपल्याच प्राणाची बाजी लावतो. तो विद्यार्थ्यांप्रतीही जबाबदारीनं काम करतो.

अलिकडील काळात त्याचीच ही जबाबदारी सरकारनं हेरली. अन् आता सरकारनं नवीन पिल्लू आणलंय. शिक्षकांनी श्वानाचा बंदोबस्त लावायचाय. जे श्वान पिसाळल्या स्वरुपाचं असेल. मग ते श्वान शिक्षकांना चावलं तरी चालेल. तो मरण पावला तरी चालेल. सरकारला त्याचं काही घेणं देणं नाही. आता शिक्षकांनी सर्वेक्षण करायचं गावागावात जाऊन. सर्वेक्षणात कुत्री मोजायची. पिसाळलेलं कुत्र शोधायचं. त्याचा बंदोबस्त लावायचा. त्यासाठी मुख्याध्यापकाला नोडल ऑफिसर बनवलं आणि शिक्षक हे त्याचे सहकारी. आता शिक्षकांनी वर्गही शिकवायचे आहेत. व्यतिरिक्त शिक्षकांनी कुत्रीही मोजायला जायचं आहे व त्याचा बंदोबस्तही लावायचा आहे. आहे की नाही कमाल.

विशेष सांगायचं झाल्यास शिक्षक हा एक जबाबदार घटक आहे. तो कोणतेही कामं करतो. याचा अर्थ असा नाही की त्याला शासनानं कोणतंही काम हे त्याच्याच जीवावर बेतनारं द्यावं. ज्यातून तो तर मृत्यू पावेलच. शिवाय त्याचा संसार उघड्यावर पडेल. अन् हीच कामं द्यायची असतील तर पोष्ट भरतांना वा शिक्षकांची नोकरी देतांना त्यासोबत एक जाहिरात नक्कीच टाकावी. ती जाहिरात म्हणजे शिक्षकांनी विवाह करु नये. जेव्हापर्यंत नोकरी असेल तेव्हापर्यंत. कारण विवाह न केल्यास स्वमुलांचा प्रश्न उद्भवणार नाही, त्याला नोकरी करतांना कमीजास्त झाल्यास त्याच्या स्वभार्याचाही संसार उध्वस्त होणार नाही. तिचं कुंकू पुसलं जाणार नाही, शिक्षकाला कमीजास्त झाल्यास कोणीच बेघर होणार नाही. अशा स्वरुपात नियुक्ती केल्या गेली तर खरंच शिक्षकही ओरडणार नाही, त्याला कोणतेही काम सोपवल्यास. तो सैनिकांसारखा देशांतर्गत कोणतंही काम करतांना मरण स्विकारुन काम करु शकेल. त्यातच तो आपले कर्तव्य बजावत असतांना मरण पावलाच तर त्याला शहिदांचाही दर्जा मिळेल हे तेवढंच खरं.

अलिकडील काळात जेवढीही कामं शिक्षकांना सोपवण्यात येत आहेत. ती कामं त्याला मरणयातनाच देणारी आहेत. ज्यातून केव्हा मरण प्राप्त होईल याची शक्यता नाकारता येत नाही. आताचा शिक्षक हा शासनाच्या अशा स्वरूपाच्या सर्वच कामानं बेजार झालेला असून तो मानसिक तणावातही जगू लागला आहे. त्यातच तो निवृत्त होताच तो जास्त दिवसही जगू शकत नाही.

शिक्षकांनी आता शिकविण्याऐवजी इतर कामे करावीत काय? हा प्रश्न आहे, अलिकडील काळात निर्माण झालेला. जसे श्वान पकडणे, हागणदारीमुक्त गाव करणे, शाळाबाह्य मुले शोधणे, लोकांना डिजीटल साक्षर बनविणे, ऑनलाईन कामं करणे. खिचडी बनविणे, सर्व प्रकारचे सर्वेक्षण करणे. खरंच ही कामे जर शिक्षक करीत असेल तर त्यानं विद्यार्थी कसे आणि केव्हा शिकवावे? त्यांचं भविष्य कसं आणि केव्हा घडवावं? देशाला आदर्श नागरिक कसे द्यावे? श्वानच पकडणे ही जर शिक्षकांची कामं आहेत तर पशुसंवर्धन व पशुसंरक्षण विभागातील लोकांनी कोणती कामे करावीत? त्यांनी बंदोबस्त लावू नये काय श्वानाचा? त्यांना श्वान पकडणे बंधनकारक नाही काय? वैगेरे प्रश्न ऐरणीचेच आहेत. त्यांनाही श्वान पकडणं बंधनकारकच आहे. परंतु शासनाला असे शिक्षक तयार करायचे आहेत. जे उद्या चालून बिबट्याचा बंदोबस्त लावू शकतील. जे पशुसंवर्धन खातं करु शकत नाही. ते कामं शिक्षक करु शकतात. हे शासनाला चांगलं माहीत आहे. म्हणूनच श्वानाचा प्रश्न मार्गी लावायचं धोरण सरकार राबवत आहे व त्याची जबाबदारी सरकार शिक्षकांनाच सोपवत आहे.

सध्या बिबट्याचा महाराष्ट्रात वावर वाढलाय. तो कोणालाही क्षतिग्रस्त करतोय. त्याची संख्याही जास्त झालेली आहे. बिबट्या राजकारणाचा भाग झालेला आहे व तो विधानभवनातही शिरत आहे. त्यातच बिबट्याचा अलिकडील काळातील जास्त वावर बघता त्यांचाही बंदोबस्त करणे गरजेचे आहे. म्हणूनच आता श्वान पकडणे हा एक सराव आहे शिक्षकांसाठी. आज शिक्षकांना श्वान पकडण्याची जबाबदारी दिलीय व तोही बंदोबस्त शिक्षक लावतीलच. हे खरे आहे. परंतु तो बंदोबस्त शिक्षक कसा लावतात. हे पाहून पुढची बिबट्या पकडण्याची जबाबदारी शिक्षकांना द्यायची असेल. यात खरंच शिक्षकांनी श्वानाची जबाबदारी यशस्वीरुपानं पेलवली तर उद्या बिबट्याची जबाबदारी मिळेल. त्यामुळंच शिक्षकांना नम्र विनंती की त्यांनी त्यांच्यावर आलेल्या श्वान पकडण्याच्या जबाबदारीला टाळू नये. ती यशस्वी पेलवावी. तरंच त्यांना बिबट्या पकडण्याची जबाबदारी मिळेल अन् संधीही. मात्र ज्यानं ही जबाबदारी यशस्वीरित्या पेलवली नाही तर उद्या त्याला बिबट्या पकडण्याचे काम मिळणार नाही. जे काम शुरतेचं आहे. मर्दानगीचं लक्षण आहे. बिबट्या पकडणं हे साहसाचं काम आहे. त्यासाठी भरपूर अनुभव हवा. तेवढीच हिंमतही हवी. जी हिंमत व अनुभव आज श्वान पकडण्याची मोहीम फत्ते केल्यानं प्राप्त होणार आहे यात शंका नाही. तेव्हा शिक्षकांनी श्वान पकडण्याच्या गोष्टीवर आढेवेढे न घेता श्वान पकडावेत. आपल्याला मिळालेली संधी व जबाबदारी यशस्वी पार पाडावी. जेणेकरुन उद्या बिबट्या योग्य त्या पद्धतीनं पकडता येतील. कारण श्वानापेक्षा बिबट्या पकडणं हे शुरतेचं लक्षण आहे. त्यासाठी हिंमत लागते. ती हिंमत श्वानाचा बंदोबस्त लावण्यातून येणार आहे यात शंका नाही.

– **अंकुश शिंगाडे**, नागपूर ९३७३३५९४५०


---

# राजकारणात मानवतेचा स्पर्श : राजेश टोपे यांचे आरोग्य नेतृत्व

*तो जव जव मार्गे चाले! कार्य करी पाऊले पाऊले! लोक पाहताचि नम्र झाले! दिसती त्यासि! तो नसेल तरी बोलका! व्याख्याता उपदेशक नेटका! तरी वक्त्या पंडिताहुनी लोकां! वजन तयाचे! ऐसीचि लोक गाव सुधारती! देशाचे नाव उज्वल करिती! नसेना कोणा त्यांची माहिती! सुगंध उधळती वनपुष्पे!!*

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या वचनाप्रमाणे राजेश टोपे यांच्या रूपाने मराठवाड्यात कार्य कुशल सुपुत्राच्या जन्म पाथरवाला येथे ११ जानेवारी १९६९ रोजी माता शारदाताई व अंकुशराव टोपे साहेबांच्या पोटी झाला. राजकारणाचा वारसा कुटुंबातूनच अगदी कॉलेज जीवनात शैक्षणिक, सामाजिक, सहकार व राजकीय कार्याची आवड जालना जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते स्व.खा. ड. अंकुशराव टोपे साहेब यांच्या संस्कारातून व देशाचे नेते मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या नेतृत्वात राजकीय जडणघडण झाली. राजेश टोपे यांनी वयाच्या २३ व्या वर्षी राजकारणात प्रवेश केला. त्यांनी सलग पाच वेळेस अंबड व घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करतानाच महाराष्ट्राच्या राजकारणात राज्यमंत्री ते कॅबिनेट मंत्री म्हणून अत्यंत कार्य कुशल, अभ्यासू व मेहनती नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण केली. राजकारण अनेकदा सत्ताकेंद्रित आणि स्वार्थप्रधान असल्याचे टीका होते. परंतु माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी आपल्या कार्यातून या समजुतीला छेद दिला.

२०१९ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले व त्यांच्याकडे आरोग्य मंत्री पदाची जबाबदारी आली. याच दरम्यान जगावर कोरोना महामारीचे संकट उभे राहिले या जागतिक आपत्तीचे प्रत्येक व्यक्तीच्या मनात भीतीचे वातावरण होते. या संकटात वेगवेगळे देशात- देशांतर्गत, राज्य अंतर्गत तसेच शहरातील व ग्रामीण भागात मदतीचे दरवाजे एकमेकांना बंद झाली. अवघ्या मानव जातीला नवीन असलेल्या कोरोना संकटाला दोन हात करण्यासाठी महाराष्ट्राचे लढवय्ये नेते राजेश टोपे साहेब अहोरात्र काम करत होते. या कार्यकाळात राज्यातील जनतेला राजेश टोपे यांनी सेवा, संवेदना आणि जबाबदारी या मूल्यांना प्राधान्य देवून राजकारणात मानवतेचा खरा अर्थ अधोरेखित केला. आरोग्य मंत्री म्हणून ग्रामीण व शहरी आरोग्य व्यवस्थेतील तफावत कमी करण्यावर भर दिला. प्राथमिक आरोग्य केंद्रे,



ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये यांची सुविधा सुधारण्यासोबतच वैद्यकीय मनुष्यबळ उपलब्धतेसाठी ठोस पावले उचलली. सामान्य रुग्णाला दर्जेदार आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळावी, हा त्यांच्या धोरणांचा केंद्रबिंदू राहिला.

कोविड-१९ महामारीच्या कठीण काळात राजेश टोपे यांचे नेतृत्व विशेषत्वाने उठून दिसले. संसर्गाची तीव्रता, आरोग्य यंत्रणेवरील ताण आणि नागरिकांमधील भीती या साऱ्या परिस्थितीत त्यांनी संयम, पारदर्शकता आणि माणुसकीचा दृष्टिकोन जपला. रुग्णालयांची क्षमता वाढवणे, टेस्टिंग सेंटर उभारणे, ऑक्सिजन पुरवठा, लसीकरण मोहीम, मेडिकल सुविधा, रुग्णवाहिका, डॉक्टर्स, नर्स स्टाफ, ऑक्सिजन बेड आणि आरोग्य कर्मचारी,पोलीस मित्र व समाजसेवकांचे मनोबल उंचावणे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सर्वसामान्य जनतेला दैनंदिन अन्नधान्य व वस्तू पुरवणे, रुग्ण तसेच नातेवाईकांना मानसिक धैर्य देण्याचे महत्त्वाचे काम रात्रंदिवस करत होते. प्रसारमाध्यमांशी संवाद साधून नागरिकांना योग्य माहिती देणे हेही त्यांच्या नेतृत्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले.

कोरोना काळात राजेश टोपे साहेब यांनी आरोग्य मंत्री या नात्याने प्रशासकीय यंत्रणा सोबत घेऊन माणुसकी कमी होत असताना आपण समाजाचे देणे लागतो या उदात्त हेतूने प्रेरित होऊन मानतवादी दृष्टिकोनातून समाजातील लहान थोर, महिला, तरुण व ज्येष्ठ नागरिकांना आपुलकीची साथ दिली. महाराष्ट्रातील कोरोनाग्रस्त जिल्ह्यातील रुग्णालयात प्रत्यक्ष भेट देऊन रुग्णांना व नातेवाईकांना मानसिक धैर्य देत आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या.

ते स्वतः इंजिनियर आहे परंतु महाराष्ट्रातील जनता त्यांना डॉक्टर म्हणून ओळखू लागली. या काळात त्यांच्या मातोश्री शारदा ताई टोपे यांचे निधन झाले. तरी भैय्यासाहेब चौथ्या दिवशी जनसेवेसाठी कार्यरत राहिले. हे सर्व कार्य करत असताना महाराष्ट्रातील जनता प्रसारमाध्यमाद्वारे बघत होती. जनतेला राजेश टोपे म्हटले की आशेचा किरण वाटत होता. जनतेचे व साहेबांचे हृदयातील नाते तयार झाले होते. महाराष्ट्रातील जनता म्हणजे कुटुंब हे त्यांनी ठरवले होते. रात्री अपरात्री राज्याच्या कानाकोपऱ्यातून त्यांना फोन येत व ते जनतेला सुविधा पुरवत होते. स्वतः त्यांना जेवणासाठी ही वेळ कमी पडत होता. या सर्व कार्यात त्यांना साथ देणाऱ्या त्यांच्या सौभाग्यवती सौ. मनीषाताई टोपे या खंबीरपणे त्यांच्या पाठीमागे उभ्या होत्या. या कार्यकर्तुत्वामुळेच राजकारणातील आजात शत्रू म्हणून त्यांची ओळख होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या वचनाप्रमाणे अगदी तंतोतंत उतरणारे व्यक्तिमत्व राजेश टोपे साहेब यांनी आपल्या गाव खेड्यापासून ते दिल्लीपर्यंत आपल्या कार्याची चुणूक दाखवली. व त्यांच्या कार्याची नोंद भारत देशात नव्हे तर डब्ल्यूएचओ पर्यंत झाली . एकूणच राजेश टोपे यांचे आरोग्य नेतृत्व हे सत्तेच्या प्रदर्शनापेक्षा सेवाभावावर आधारित राहिले. सामान्य नागरिकांच्या वेदना समजून घेणारे, संकटात धीर देणारे आणि आरोग्याला मूलभूत हक्क मानणारे हे नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात मानवतेचा स्पर्श उमटवणारे ठरले.

साहेबांच्या अभिष्टचिंतन दिनानिमित्त महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या वतीने साहेबांना निरोगी व दीर्घ आयुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

– **डॉ. शंकर तिकांडे**, जालना (८८८८१७११३४)

# खा.बजरंग सोनवणे घेणार विकासाच्या 'दिशा'चा आढावा

## १३ जानेवारीला होणार मॅरेथॉन बैठक, केंद्र,राज्यांच्या योजनांचा समावेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/प्रतिनिधी/** केंद्र शासनाच्या विविध महत्त्वाकांक्षी योजना आणि राज्य शासनाच्या विकासात्मक उपक्रमांची जिल्हास्तरावर प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या उद्देशाने जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवार, १३ जानेवारी रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत दिशा समितीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. लोकसभा सदस्य व दिशा समितीचे अध्यक्ष खा.बजरंग सोनवणे यांच्या पुढाकाराने ही बैठक होत असून ते विकास कामांचा आढावा घेणार आहेत.

या संदर्भात खासदार सोनवणे यांच्या सुचनेनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागप्रमुख, यंत्रणा प्रमुख व अंमलबजावणी अधिकाऱ्यांना दिशा समितीच्या बैठकीस सक्तीने उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. बैठकीदरम्यान केवळ औपचारिक आढावा न घेता, प्रत्यक्ष कामांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव, निधी वितरण, अडचणी व त्यावरील उपाययोजना तसेच पुढील कालावधीसाठी कृती आराखडा यावर सखोल चर्चा केली जाणार आहे. या बैठकीत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या १३ महत्त्वाच्या योजना व विभागांचा मुद्देनिहाय आढावा घेतला जाणार आहे. यात प्रामुख्याने नेहरू युवा केंद्र, महिला व बालविकास विभागांतर्गत पोषण, अंगणवाडी व महिला सक्षमीकरण योजना, कौशल्य विकास विभागाच्या प्रशिक्षण व रोजगाराभिमुख योजना, तसेच प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत रस्ते विकास कामांची प्रगती यांचा समावेश आहे. स्वच्छ भारत मिशनअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलांची सद्यस्थिती, जलजीवन मिशनमधील नळजोडणी व पाणीपुरवठा, तसेच पर्यटन व संस्कृती विभागांतर्गत पर्यटन विकासाची कामे यांचाही सखोल आढावा घेतला जाणार आहे.

**आरोग्य, उद्योग व सामाजिक योजनांवर विशेष भर**

बैठकीत आरोग्य विभागांतर्गत केंद्र शासन पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी, संजय गांधी निराधार योजना, एक जिल्हा एक उत्पादन योजनेद्वारे स्थानिक उद्योगांना चालना, तसेच प्रधानमंत्री जनधन अभियानांतर्गत आर्थिक समावेशनाची स्थिती यावरही चर्चा होणार आहे.

**अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना**

सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी अद्ययावत अहवाल, प्रगती आकडेवारी, प्रलंबित प्रकरणांची यादी आणि पुढील सहा महिन्यांचा कृती आराखडा घेऊन बैठकीस उपस्थित राहावे, अशा स्पष्ट सूचना खा.सोनवणे यांनी दिल्या आहेत. योजनांची अंमलबजावणी केवळ कागदावर न राहता ती थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे, यावर बैठकीत भर दिला जाणार आहे.

**विकासाला गती मिळण्याची अपेक्षा**

या दिशा समिती बैठकीमुळे बीड जिल्ह्यातील विकासकामांतील अडथळे दूर होऊन, योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. विशेषत: ग्रामीण भागातील रोजगार, पायाभूत सुविधा, पाणी, वीज, आरोग्य व निवारा या मूलभूत प्रश्नांवर ठोस निर्णय होण्याची शक्यता आहे.

# जुगार अड्ड्यावर छापा: २,०९,७७० रुपये चा मुद्देमाल जप्त

## बिडकीन क्षेत्रातील पाटोदे वडगाव येथे कार्यवाही



**आत्ताच एक्सप्रेस**

**बिडकीन/प्रतिनिधी/** बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाटोदे वडगाव शिवारातील एका शेतात सहा जुगारी जुगार खेळताना पकडले गेले. घटनास्थळावरून रोख रक्कम, ०४ दुचाकी आणि ३ मोबाईल फोन जप्त करण्यात आला. या प्रकरणी आयपीसीच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुवारी, ८ तारखेला बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाटोदे वडगाव परिसरातील एका शेतात काही लोक जुगार खेळत होते. गुप्त माहितीवरून कारवाई करताना, बिडकीन पोलीस उपनिरीक्षक मनजित सिंग सेना आणि त्यांच्या पथकाने परिसरात छापा टाकला आणि सहा जुगारींना अटक केली, तर इतर सहा जण पळून जाण्यात यशस्वी झाले. त्यांच्या ताब्यातून खालील वस्तू जप्त करण्यात आल्या. रोख रक्कम: ३,७७०, ०४ मोटारसायकली (अंदाजे १,६०,०००), ०३ अँड्रॉइड मोबाईल फोन (अंदाजे ४६,०००), ५२ पत्त्याचे कॅट, एकूण किंमत २,०९,७७०, रु. अटक केलेले आरोपी १) भाऊसाहेब मगन आवारे २) दत्ता लक्ष्मण आवारे ३) बबन छगन आवारे ४) बद्री एकनाथ गायके ५) बंडू विश्वनाथ आवारे ६) राजू खंडुसिंग सोने सर्व रा. पाटोदे वडगाव, तहसील पैठण.

फरार आरोपी : १) प्रवीण अशोक आवारे, २) नवनाथ लक्ष्मण आवारे, ३) पांडू रमेश आवारे, ४) पांडू कचरू आवारे, ५) राजू रमेश गंगवे, ६) गौतम रूपचंद खरात ( सर्व रा बोकुड जळगाव) बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक नीलेश शेळके यांच्यां मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मंजित सिंग सेना,पो को,पवन चव्हाण, दिनेश चव्हाण, स्वप्नील दिलवाले, यांनी केली आहे.

# उपरे परिवारातर्फे सावित्रीबाई फुले जयंती सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/प्रतिनिधी/** थोर समाजसुधारिका,स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उपरे परिवाराच्या वतीने मोठ्या उत्साहात व सामाजिक जाणीव जपत दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी साजरी करण्यात आली. हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत असून, महिलांच्या शिक्षण, सक्षमीकरण व वैचारिक प्रबोधनाचा उद्देश ठेवून हा कार्यक्रम आयोजित केला जातो. कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महिलांसाठी स्नेह मिलनाचे आयोजन करण्यात आले. या वेळी उपस्थित महिलांसाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण करण्यात आले असून शिक्षण, वाचनसंस्कृती, सामाजिक जाणीव व महिलांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. उपरे परिवाराच्या वतीने दरवर्षी या जयंतीनिमित्त प्रेरणादायी महापुरुष, महामानव व थोर समाजसुधारक यांची विचारधारा मांडणारी पुस्तके महिलांना भेट म्हणून दिली जातात. तसेच महिलांच्या आरोग्याविषयी जागृती व्हावी या उद्देशाने आरोग्य विषयक मार्गदर्शक पुस्तकेही वितरित करण्यात येतात. वाचनातून विचार समृद्ध होतात तसेच आरोग्यविषयक माहितीमुळे महिलांचे जीवन अधिक सुदृढ व सक्षम होते, असा संदेश या उपक्रमातून दिला जातो. या कार्यक्रमास बीड परिसरातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपरे परिवारातील श्रीमती कमल हनुमंतराव उपरे, सौ. मृणालिनी संतोष उपरे, प्रियंका संदीप उपरे व कुमारी श्रावस्ती संदीप उपरे यांनी उपस्थित महिलांचे स्वागत व आदरातिथ्य केले. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा आणि महिलांना शिक्षण, विचारप्रवर्तन, आरोग्य जागृती व आत्मनिर्भरतेकडे प्रेरित करणारा उपरे परिवाराचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी व अनुकरणीय ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# ई बसडेपो व इलेक्ट्रिक चार्जिंग सेंटरला मंजुरी दिल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे आभार

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज /प्रतिनिधी/** केजला बसडेपो सुरु करावा या मागणीसाठी गेली अनेक वर्षे केज विकास संघर्ष समिती शासनाकडे विविध आंदोलने व निवेदनाच्या रूपाने पाठपुरावा करत होती. यासाठी समितीने दोन महिन्यापूर्वी महाराष्ट्राचे परिवहन मंत्री ना प्रताप सरनाईक यांची मुंबई येथे भेट घेऊन पाठपुरावा केला होता. मंत्रिमहोदयानी संबंधित विभागाला तात्काळ कार्यवाहीचे आदेशही दिले होते. केज भेटीमध्ये मा मंत्रिमहोदयाची गाडी आरक्षित बसडेपो जागेजवळ थांबवून त्यांना तातडीची कार्यवाही करण्याची विनंती केली होती. केजच्या आमदार नमिताताई मुंदडा यांच्या प्रयत्नाचीही या कामी मोठी साथ मिळाली.


आता केज शहरासाठी ई बसडेपो मंजुरीमुळे केजच्या प्रवाशांना मोठा फायदा होईल तसेच केजच्या वैभवात मोठी भर पडणार आहे. लांब पल्याच्या बसगाड्या तसेच इमर्जन्सी बससेवा केज येथून उपलब्ध करणे शक्य होणार आहे. कोणत्याही समस्यांचा पाठपुरावा करून त्या शासन व समाज दरबारी मांडण्यासाठी सामाजिक संघटना आवाज उठवत असतात, त्या सोडवण्याचे काम प्रशासन व जबाबदार लोकप्रतिधीचेच असते. केज विकास संघर्ष समितीने गेली अनेक वर्षे या मागणीसाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. ही समस्या सोडवण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री, परिवहन मंत्री तसेच स्थानिक आमदार यांचे केज विकास संघर्ष समिती ने आभार व्यक्त केले आहेत. सध्या केज शहर अंतर्गत महामार्गवरील वाहतूक कोंडी व अपघात तातडीची मोठी समस्या बनली आहे. त्यामुळे यापुढे केजची महत्वाची समस्या रिंगरोड (बायपास) किंवा उड्डाणपूल यापैकी केजवासियांना सोयीचे व फायद्याचे होईल तो पर्यायी रस्ता केज शहराला उपलब्ध करून देण्यासाठी समिती आपला लढा सूरु ठेवणार असून स्थानिक लोकप्रतिनिधी खासदार बजरंग बप्पा सोनवणे व आमदार नमिताताई मुंदडा यांनी विशेषलक्ष घालून सहकार्य करावे अशी मागणी समितीच्या वतीने समन्वयक हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे इंजिनिअर मोहनराव कराड, संपत वाघमारे, महेश जाजू यांनी केली आहे.

# कन्नड नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित,लोकनियुक्त नगराध्यक्षा पदी शेख फरीन बेग अब्दुल जावेद विराजमान



**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी.उदय कुलकर्णी** / दि ५ सोमवार रोजी कन्नड नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित,लोकनियुक्त नगराध्यक्षा पदी शेख फरीन बेग अब्दुल जावेद विराजमान झाल्या आहेत.



यावेळी शहरातील त्यांच्या तहसील रोड वरील कार्यालया पासून त्यांची फटाक्याच्या अतिषबाजीत व ढोल ताशाच्या गजरात न.परिषद कार्यालया पर्यंत भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली.न.परिषदेत त्यांनी नियमाप्रमाणे अध्यक्ष पदाचा कारभार स्वीकारुण पदावर विराजमान झाल्या.यावेळी न.प.कार्यालयात त्यांचे अभिनंदन करणेसाठी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस तथा विरोधकांचे पानिपत करून पक्षाकडे हे महत्वाचे पद खेचून आणणेसाठी महत्वाची भूमिका बजावणारे मा.आमदार नामदेवराव पवार,पक्षाचे जिल्हाध्यक्ष किरण पाटील,भाजपाचे नेते तथा युवा उद्योजक मनोज पवार,डॉ.सदाशिव पाटील, काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेवक, शहरातील व्यापारी वर्ग, प्रतिष्ठित नागरीक विविध पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते न.प.कार्यालयाचे प्रशासकीय अधिकारी या पार पडलेल्या भव्य - दिव्य सोहळ्या प्रसंगी उपस्थित होते.यावेळी बोलतांना नगराध्यक्षा शेख फरीन म्हणाल्या की,शहरातील सर्व मतदार बंधू- बगिनी व जेस्ट कानिष्ठानी मला मतदान करून जो विस्वास दाखवला त्यास माझे कडुन येणाऱ्या कालावधीत कधीच तडा जाऊ देणार नाही.याची मी काळजी घेईल, व शहरातील नागरिकांना त्यांना हव्या असलेल्या सर्व सुविधा पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस काम करील असेही सूचित केले.यासाठी मला माझ्या सोबत काम करणाऱ्या सर्व पक्षीय नगरसेवक तथा शहरवासियांच्या आशीर्वादाची गरज पडणार आहे.त्यांचे मार्गदर्शनाखाली मी शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेईल.

# दर्पण दिनानिमित्त पिशोर पोलीस स्टेशन येथे घाटमाथा सर्व पत्रकारांचा सत्कार पोलीस निरीक्षक शिवाजीराव नागवे साहेब यांच्या हस्ते

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ ग्रामीण प्रतिनिधी.सुनिल निकम/** कन्नड तालुक्यातील पिशोर येथे दि. ६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दर्पण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पिशोर घाटमाथा पत्रकार संघाच्या वतीने बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



दर्पण दिनाचे औचित्य साधून पिशोर घाटमाथा पत्रकार संघाची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस पिशोर, नाचनवेल, वासडी, करंजखेड, नागापूर, चिंचोली (लिं.), तसेच पंचक्रोशीतील प्रिंट मीडिया व इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये कार्यरत असलेले पत्रकार व वार्ताहर मोठ्या संख्येने उपस्थित होते. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या बैठकीत पत्रकारितेच्या सद्यस्थितीवर, पत्रकारांच्या समस्या तसेच संघाच्या पुढील वाटचालीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

पत्रकार हा वृत्तपत्राचा गाभा असून वृत्तपत्रे ही लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असल्याचे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. पत्रकारांच्या लेखणीला बळ मिळावे, संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न मार्गी लागावेत, या उद्देशाने संघ अधिक सक्रियपणे काम करणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

या बैठकीदरम्यान पिशोर घाटमाथा पत्रकार संघाच्या चौथ्या वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी सुरेश जाधव यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी कारभारी हराळ,आरमान मदार तर सचिवपदी बापु रामकर, सल्लागार बापुसाहेब हरणकाळ यांची निवड करण्यात आली. तसेच संघासाठी सल्लागारांचीही नियुक्ती करण्यात आली.दरम्यान, पिशोर पोलीस ठाण्यात सर्व उपस्थित पत्रकार बांधवांचा सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजीराव नागवे, उपनिरीक्षक विश्वजित फरताडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पत्रकार समाजासाठी करीत असलेल्या कार्याचे कौतुक करत त्यांनी पत्रकार व पोलीस यांच्यातील समन्वय अधिक दृढ राहावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमास प्रकाश मैंद, दत्ता पवार,आरमान मदार, जावेद शेख,अनिल सुरडकर, बापूसाहेब हरणकाळ, कारभारी हराळ, राजेंद्र गोसावी, ज्ञानेश्वर गायकवाड, सुनील निकम, मिलिंद लांडगे, रविंद्र खरात, सचिन गाडेकर, योगेश शेळके, निलेश रोडे, सत्यम गवळी, पंढरी लोखंडे, ज्ञानेश्वर दवंगे, भागिनाथ मोकासे, आनंद सुरासे, गणेश माळी, हरी लोखंडे,संतोष पाटिल कार्तिक राजगुरू शिवाजी नवले यांच्यासह परिसरातील अनेक पत्रकार उपस्थित होते.

दर्पण दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे पत्रकारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून संघटनात्मक एकतेचा संदेश देण्यात आला.

## संक्षिप्त

### केजच्या बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाचे प्रा. सुरेश कांबळे यांना 'पीएच.डी.' प्रदान

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज /प्रतिनिधी/** केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक सुरेश अर्जुनराव कांबळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च मानली जाणारी 'पीएच.डी.' (Ph.D.) पदवी बहाल केली आहे. त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**संशोधनाचा विषय आणि मार्गदर्शन :** डॉ. सुरेश कांबळे यांनी रसायनशास्त्र विषयात फार्माकोलॉजिकल स्टडी ऑफ सम हेटरो सायकलीक कंपाउंड विथ स्पेशल रेफरन्स टू सोल्युट – सॉलवंट इंट्रॅक्शन्स (Pharmacological Study of Some Heterocyclic Compounds with Special Reference to Solute-Solvent Interactions) या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता.

हे संशोधन त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील मौलाना आझाद महाविद्यालयाचे प्रोफेसर डॉ. सुजात कादरी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. त्यांच्या या शोधप्रबंधाची मौखिक परीक्षा नुकतीच पार पडली. या परीक्षेसाठी अध्यक्ष म्हणून रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. सुनील शंकरवार यांनी काम पाहिले, तर बाह्य परीक्षक म्हणून नैनिताल येथील कुमाऊँ (कामरून) विद्यापीठाचे प्रो. डॉ. शाह राज अली उपस्थित होते.

**सर्वस्तरातून कौतुक :** डॉ. सुरेश कांबळे यांच्या या उत्तुंग यशाबद्दल विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने: रमेशराव आडसकर (चेअरमन, अंबा सहकारी साखर कारखाना, अंबाजोगाई) अर्चनाताई आडसकर (सदस्या, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद) डॉ. माधवराव फावडे (प्राचार्य, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय) डॉ. अनिल किर्दंत (उपप्राचार्य) पी. एस. भोसले (अधीक्षक) यांसोबतच डॉ. अनिल गायकवाड, डॉ. सुवर्णकार, डॉ. शितोळे, डॉ. वेदपाठक आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी डॉ. कांबळे यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### प्रगती विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न



**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/प्रतिनिधी/** प्रगती विद्यालय बालेपीर बीड या शाळेची शैक्षणिक सहल २ जानेवारी २०२६ ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीत प्रेक्षणीय स्थळे धार्मिक ऐतिहासिक व भौगोलिक स्थळांना भेटी देऊन संपन्न झाले आहे या शैक्षणिक सहलीमध्ये एकूण १२० विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभाग घेतला होता सहल बीडवरून पंढरपूर नरसिंह वाडी कोल्हापूर येथे शाहू पॅलेस रंकाळा तलाव महालक्ष्मी मंदिर कन्हेरमठ पाहाण्याचा आनंद घेतला ज्योतिबाचे दर्शन घेऊन विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांनी बांधलेले ऐतिहासिक राधानगरी धरण पाहिले तसेच सिंधुदुर्ग किल्ला पाहण्यासाठी विद्यार्थी समुद्रामध्ये बोटीने प्रवास करण्याचा व गाण्याचा आनंद लूटला घेतला देवगड व विजयदुर्ग या ऐतिहासिक किल्ल्याची माहिती गाईड द्वारा घेतली गणपतीपुडे येथे दर्शन घेऊन समुद्रामध्ये पोहण्याचा आनंद घेतला पावस प्रतापगड महाबळेश्वर पाचगणी प्रतिबालाजी जेजुरी व मोरगावचे गणपती आदी स्थळांना भेटी देऊन एस टी महामंडळाच्या चालकाने सुखरूप बीड येथे परत आले या सहलीसाठी प्रोत्साहन देणारे आमचे आधारस्तंभ माननीय रामकृष्ण जी बांगर साहेब सचिव सौ सत्यभामाताई बांगर साहेब ही सहल यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक गोपाळघरे सर कंठाळे सर शेख सर घोळवे सर कदम सर सानप सर नागरगोजे सर मस्के सर वाघवाले सर ढवळे सर अग्रवाल मॅडम नागरगोजे मॅडम व सर्वच शिक्षकांनी परिश्रम घेतले सर्वात महत्त्वाचे आमचे आचारी मस्के मामा मामी व मुंडे मामा नारायण मुंडे यांनी भोजनाची चांगल्या प्रकारे व्यवस्था केली तसेच सहल प्रमुख शेख सर यांनी चोक व्यवस्था केली सहल सुखरूप आल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी आनंद व्यक्त केला.

### वंचित बहुजन आघाडी नांदेड दक्षिण, जिल्हा अध्यक्षपदी शंकर महाजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर /प्रतिनिधी/** वंचित बहुजन आघाडीचे निष्ठावंत कार्यकर्ते,शंकर गंगाधर महाजन यांची. नांदेड दक्षिण जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे, असे निवडीचे पत्र वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव प्राध्यापक किशन चव्हाण यांनी दिली आहे, शंकर महाजन यांच्या जिल्हा अध्यक्षपदी निवडीचे सर्व कार्यकर्त्यांकडून त्यांचं, बिलोली तालुक्यातील सर्व कार्यकर्ते, व नांदेड जिल्ह्यातील कार्यकर्ते शुभेच्छांचा वर्षाव होत आहे,शंकर महाजन साहेब हे आदरणीय बाळासाहेब आंबेडकरांचे विश्वासू असून,बसव ब्रिगेड संस्थापक अध्यक्ष,अविनाश भाऊ भोसीकर यांचे खांदे समर्थक व शिवभाऊ नरंगले यांचे समर्थक आहेत, व बसव ब्रिगेड नांदेड जिल्हा संघटक आहेत, गेल्या १० ते १५ वर्षापासून सामाजिक कार्यात स्वतःला वाहून घेण्याचे कार्य शंकर महाजन यांनी केले आहे, त्यांनी तळागाळातील, गोरगरिबांना, न्याय देण्याचं काम बिलोली तालुक्यात व नांदेड जिल्ह्यामध्ये, वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष म्हणून केलेली आहे,लिंगायत समाजाचे नेतृत्व म्हणून बिलोली तालुक्यामध्ये त्यांची मोठी ओळख आहे, अशा सामान्य माणसाची जाणीव असणारा व सामान्य कार्यकर्त्यांना न्याय देणारा,आणि पक्ष संघटन मजबूत करणारे,एक नेतृत्व नांदेड जिल्ह्याला लाभलेला आहे असे,वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांची प्रतिक्रिया मिळत आहेत,आदरणीय बाळासाहेबांनी शंकर महाजन यांना जिल्हा अध्यक्ष पदी निवड केल्याबद्दल बाळासाहेब आंबेडकरांचे सुद्धा शंकर महाजन यांच्याकडून धन्यवाद दिले आहे.



# दुधना नदीपात्रातील वाळू माफियांवर प्रशासनाचा धडकवार

## दबंग तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कारवाई; ट्रॅक्टर पळवणाऱ्या सराईत गुन्हेगारावर गुन्हा दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** अंबड तालुक्यातील दुधना नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने जोरदार कारवाई करत वाळू माफियांचे मनसुबे उधळून लावले आहेत.दबंग, कर्तव्यदक्ष आणि कोणत्याही दबावाला न जुमानणारे तहसीलदार विजय चव्हाण यांच्या थेट मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.



तहसील कार्यालयास दुधना नदीपात्रात अवैधरीत्या वाळू उपसा सुरू असल्याची गोपनीय माहिती प्राप्त होताच महसूल पथकाने तत्काळ घटनास्थळी धाड टाकली.यावेळी रोहित संजय जगताप व त्याचे साथीदार कोणताही शासकीय परवाना नसताना वाळू उत्खनन करून वाहतूक करत असल्याचे आढळून आले.पथकाने परवान्याची चौकशी केली असता कोणताही वैध दस्तऐवज सादर करण्यात आला नाही.

महसूल अधिकाऱ्यांनी कायदेशीर कारवाईसाठी वाळूने भरलेले ट्रॅक्टर ताब्यात घेण्याचा प्रयत्न करताच आरोपी रोहित जगताप याने अधिकाऱ्यांशी हुज्जत घालत शिवीगाळ केली व शासकीय कामात अडथळा निर्माण केला. एवढ्यावरच न थांबता त्याने जबरदस्तीने वाळूने भरलेले ट्रॅक्टर घटनास्थळावरून पळवून नेले.या गंभीर प्रकारामुळे महसूल प्रशासनाने कडक भूमिका घेत संबंधित आरोपींविरोधात अंबड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

रोहित संजय जगताप हा सराईत गुन्हेगार असून यापूर्वीही त्याच्यावर अवैध वाळू उपसा व वाहतुकीप्रकरणी अंबड तहसील कार्यालयामार्फत गुन्हे दाखल आहेत. दंडात्मक कारवाई सुरू असतानाही कायद्याची भीती न बाळगता पुन्हा गुन्हा केल्याने प्रशासनाच्या रोषाला तो सामोरा जात आहे.

अवैध वाळू माफिया तसेच शासकीय कामात अडथळा आणणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. अशा गुन्हेगारांवर केवळ गुन्हे दाखल करून प्रशासन थांबणार नसून भविष्यात एमपीडीए किंवा तडीपारीसारखी कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल,असा ठाम इशारा तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिला आहे.अंबड तालुक्यात अवैध धंद्यांना यापुढे थारा दिला जाणार नाही,असेही त्यांनी स्पष्ट केले.

सदर धडाकेबाज कारवाई माननीय जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी श्रीमती असीमा मित्तल,अप्पर जिल्हाधिकारी श्री.रमेश मिसाळ व उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या कारवाईत तलाठी स्वप्नील खरात यांच्यासह श्याम विभूते,रमेश वालेकर,विकास डोळसे व गोपाळ गाडेकर या कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

# बोरगाव तांडा जिल्हा परिषद शाळेच्या व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**रांजणी (प्रतिनिधी)** घनसावंगी तालुक्यातील बोरगाव तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची (SMC) निवड प्रक्रिया नुकतीच उत्साहात पार पडली. यामध्ये अध्यक्षपदी संतोष पवार आणि उपाध्यक्षपदी कैलास राठोड यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



### संतोष पवार अध्यक्ष तर कैलास राठोड उपाध्यक्ष

शालेय व्यवस्थापन समितीची मुदत संपल्याने नवीन समिती स्थापन करण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला गावातील पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदासाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्याने ही निवड बिनविरोध झाल्याची घोषणा करण्यात आली.

निवड झालेल्या नूतन पदाधिकाऱ्यांचा आणि सदस्यांचा यावेळी शिक्षक वृंद व पालकांच्या वतीने पुष्पहार घालून यथोचित सत्कार करण्यात आला. गावातील शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी ही समिती कटिबद्ध राहील, असा विश्वास नूतन अध्यक्षांनी यावेळी व्यक्त केला.यावेळी बोरगाव तांडा येथील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ, युवक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. समितीच्या निवडीनंतर ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला असून, शाळेच्या प्रगतीला यामुळे नवी दिशा मिळेल अशी भावना व्यक्त केली जात आहे.या निवड सभेला शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, अंगणवाडी सेविका तसेच गावातील प्रमुख मान्यवर उपस्थित होते. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचे तालुक्यातून कौतुक होत आहे.

## मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठ सजली

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** मकर संक्रांतीचा सण अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपला असून, बाजारपेठेत मोठी लगबग पाहायला मिळत आहे. ठिकठिकाणी घेवर-फेणी, तिळाचे लाडू आणि सुगडांची दुकाने थाटली गेली आहेत. विशेषतः गोड पदार्थांच्या दुकानांमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी होत असून, शहरातील 'आनंद घेवर-फेणी स्वीट मार्ट' आपल्या ४० वर्षांच्या जुन्या परंपरेमुळे ग्राहकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरले आहे.

संक्रांतीला घेवर-फेणी आणि तिळाच्या पदार्थांना विशेष महत्त्व असते. आनंद घेवर स्वीट मार्टमध्ये शुद्धता आणि चवीची परंपरा जपत विविध प्रकारचे पदार्थ उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

खाद्यपदार्थांसोबतच सुवासिनींसाठी लागणारे हळदी-कुंकू आणि वाणाचे साहित्य देखील मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले आहे. यंदा स्टील आणि प्लास्टिकच्या वस्तूंच्या वाणाला महिलांची अधिक पसंती दिसून येत आहे. तसेच, लहान मुलांसाठी आणि नववधूंसाठी लागणारे हलव्याचे दागिने आणि तिळवण साहित्याने बाजारपेठ फुलून गेली आहे.मकर संक्रांतीच्या या उत्साहामुळे व्यापाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, पुढील चार दिवस ही गर्दी अधिकच वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## व्यापाऱ्यांच्या हिताचा विचार करणाऱ्यांनाच आमचे मतदान

**जालना/प्रतिनिधी/**

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत जालना जिल्हा व्यापारी महासंघाने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. शहर व जिल्ह्यातील सुमारे २० हजार व्यापाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या महासंघाने, जो पक्ष किंवा उमेदवार व्यापाऱ्यांच्या मागण्यांचा समावेश आपल्या जाहीरनाम्यात करेल, त्यांनाच मतदान करण्याचा निर्णय घेतला आहे.व्यापारी महासंघाने शहराच्या विकासासाठी आणि व्यापार वृद्धीसाठी प्रशासनासमोर व राजकीय पक्षांसमोर मागण्यांची शिदोरी ठेवली आहे.कर प्रणालीत सुधारणा: सध्या स्थगित असलेला आस्थापना कर पूर्णपणे रद्द करावा. तसेच, मालमत्ता भाड्याने दिल्यावर आकारला जाणारा ५०% कर रद्द करून तो कार्पेट एरियानुसार किंवा कमर्शियल दराने आकारावा, जेणेकरून कॉर्पोरेट कंपन्या शहरात येतील.

## नवीन जालन्यातील मुख्य रस्त्यावर गड्ड्यांचे साम्राज्य; रुग्ण आणि औषध विक्रेते हैराण

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** शहरातील आरोग्याची 'लाईफलाईन' समजल्या जाणाऱ्या नवीन जालन्यातील दवा मार्केट (ऑीस चरीझर्शी) कडे जाणाऱ्या रस्त्याची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या मुख्य रस्त्यावर जागोजागी मोठमोठाले गड्डे पडले असून, त्यात पावसाचे आणि सांडपाणी साचल्याने या परिसराला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.दवा मार्केट हा असा परिसर आहे जिथे जिल्ह्यासह शेजारच्या जिल्ह्यातून शेकडो रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक औषधी घेण्यासाठी येतात. मात्र, रस्त्यावरील या जीवघेण्या गड्ड्यांमुळे रुग्णवाहिका आणि खासगी वाहनांना इथून मार्ग काढणे कठीण झाले आहे. गड्ड्यांचा अंदाज न आल्याने अनेक दुचाकीस्वार पडून जखमी होण्याच्या घटना रोजच्याच झाल्या आहेत. विशेषतः गंभीर रुग्णांना घेऊन जाणाऱ्या वाहनांना या खडतर प्रवासाचा मोठा फटका बसत आहे.केवळ रुग्णच नव्हे, तर या भागातील औषध विक्रेते आणि स्थानिक व्यापारीही प्रशासनाच्या कारभारावर संताप व्यक्त करत आहेत. रस्त्यावर साचलेल्या सांडपाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. औषधी विक्रीच्या केंद्रावरच अस्वच्छता आणि रोगाला निमंत्रण देणारी परिस्थिती असणे हे दुर्दैव आहे, अशी भावना स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

**मोठमोठाले गड्डे:** रस्त्याचे डांबरीकरण पूर्णपणे उखडले असून १ ते २ फुटांपर्यंत खोल गड्डे पडले आहेत.**जलमय रस्ते:** पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य निचरा व्यवस्था नसल्याने गड्ड्यांमध्ये पाणी साचून चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

**वाहतूक कोंडी:** गड्ड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावत असल्याने या मार्गावर तासनतास वाहतूक कोंडी होत आहे.

# नादरपूर जिल्हा परिषद शाळेत 'आनंदनगरी' उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील नादरपूर येथील जिल्हा परिषद शाळेत शनिवारी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी 'आनंदनगरी' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिरा गणेश निकम हे होते.



व्यावहारिक ज्ञानाची शिदोरी: आनंदनगरीचे उद्घाटन विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता, त्यांना व्यावहारिक जगाची ओळख व्हावी आणि व्यवहारातील बारकावे समजावेत, या उद्देशाने शाळेत 'आनंदनगरी' (बाल आनंद मेळावा) भरवण्यात आली होती. या आनंदनगरीचे उद्घाटन नादरपूर गावातील प्रतिष्ठित नागरिक व सरपंच पती दिलीप निकम यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष गणेशभाऊ घुगे, माजी जिल्हा परिषद सदस्य केतन भैय्या काजे, गोकुळ डहाके, 'सामना'चे पत्रकार रवींद्र पिंपळे आणि विशेष शिक्षक उत्तम आघाडी यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आनंदनगरीमध्ये विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे आणि वस्तूंचे स्टॉल्स लावले होते. या माध्यमातून खरेदी-विक्रीचा व्यवहार कसा चालतो, नफा-तोटा आणि ग्राहकांशी संवाद साधण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना आत्मसात करता आले. शिक्षणासोबतच व्यवहाराची आणि ज्ञानाची गोडी निर्माण होण्यासाठी असे उपक्रम प्रत्येक शाळेत राबवणे आवश्यक असल्याचे मान्यवरांनी यावेळी नमूद केले.

मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला जिल्हा प्रशासकीय अधिकारी, तंटामुक्त समिती अध्यक्ष, पोलीस पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य आणि गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक नरेंद्र पाटील सर, जगन्नाथ कोंडके सर, आर. के. निकम, पोपट जंगले, संतोष घोडके यांच्यासह सर्व शिक्षक वृंदाने परिश्रम घेतले.यावेळी ज्ञानदीप इंग्लिश स्कूल, म्हसला येथील विद्यार्थी आणि मुख्याध्यापक डी. एन. पालोदकर व शिक्षक वृंद देखील उपस्थित होते. ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, कर्मचारी, माता पालक आणि ग्रामस्थांच्या मोठ्या उपस्थितीने या सोहळ्याची शोभा वाढली.

# 'हिंद दी चादर'श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथील कार्यक्रमाच्या अनुषंगाने पूर्वतयारी बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५०व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास देशासह आंतरराष्ट्रीयस्तरावरून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असून, या कार्यक्रमास जालना जिल्ह्यातील भाविकांना उपस्थित राहता यावे यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात यावी. तसेच विविध माध्यमातुन शक्य तेवढी मदत पोहचविण्यात यावी यासाठी नियोजन करावे अशा सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित होणाऱ्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत श्रीमती मित्तल बोलत होत्या. यावेळी बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, सुचित कुलकर्णी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल, शिक्षणाधिकारी बी. आर. खरात यांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, नांदेड येथे होणाऱ्या शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना मानणारे लाखो भाविक नांदेडमध्ये येणार आहेत. जालना जिल्ह्यात देखील श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना मानणारे शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव व उदासीन असे नऊ समाज-संप्रदायातील भाविक मोठ्या प्रमाणात आहेत. त्या अनुषंगाने या नागरिकांना या कार्यक्रमास उपस्थित राहाता यावे यासाठी आपल्या जिल्ह्यातील सर्व तालूके आणि ग्रामीण भागात विविध माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात यावी. यासाठी शिक्षण विभागाने युवकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध, वकृत्व, रिल्स स्पर्धा आयोजित कराव्यात. तसेच सीएसआरच्या माध्यमातून किंवा दानशुर व्यक्तीकडून अन्न-धान्य, पाणी आदी मदत करता येईल का याचे नियोजन करावे. तसेच जालना जिल्ह्यातून नांदेड येथे येणाऱ्या भाविकांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी वैद्यकीय कॅम्प उभारण्यासाठीचे नियोजन करावे.

तसेच शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव व उदासीन असे नऊ समाज-संप्रदायातील मान्यवरांची बैठक आयोजित करुन व्यापक जनजागृती आणि विविध माध्यमातून कोणती मदत करता येईल याची माहिती घेवून त्यानुसार नियोजन करावे.

यावेळी बैठकीस मुख्याधिकारी, गट शिक्षणाधिकारी आदींची उपस्थिती होती.

# संक्षिप्त

## अग्रशक्ती बहु मंडळाचा पदग्रहण सोहळा व २० वर्ष पूर्ती उत्साहात साजरी



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** येथील अग्रशक्ती बहु मंडळाच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा तसेच मंडळाच्या २० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा उत्सव मंगळवार, दि. ७ जानेवारी रोजी शहरातील रुक्मिणी गार्डन येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास मंडळाच्या सदस्यांसह समाजातील मान्यवर महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. या सोहळ्यात अध्यक्षपदी सौ. नेहा शिरीष अग्रवाल, सचिवपदी सौ. रुची अर्पण गोयल, कोषाध्यक्षा म्हणून सौ. श्वेता सिद्धांत तवरावाला, उपाध्यक्षपदी सौ. नेहा विशाल गुप्ता, तसेच सहसचिवपदी सौ. पायल करण अग्रवाल यांनी पदभार स्वीकारला. तसेच मार्गदर्शक (-dvisory) म्हणून सौ. सपना प्रेमेंद्र अग्रवाल व सौ. स्मिता राजेशपित्ती यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात पदग्रहण समारंभाने झाली. नूतन कार्यकारिणी सदस्यांनी आपल्या पदाची शपथ घेतली. कार्यक्रमादरम्यान हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी केक कटिंग करून मंडळाच्या २० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आनंद साजरा करण्यात आला.

२० माजी अध्यक्षांचा विशेष गौरव अग्रशक्ती बहु मंडळाच्या स्थापनेपासून आजपर्यंत अध्यक्षपद भूषविणाऱ्या २० माजी अध्यक्षा यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व संघटनात्मक योगदानाबद्दल पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.माजी अध्यक्षांच्या मार्गदर्शनामुळेच मंडळाची वाटचाल अधिक सक्षम झाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अग्रशक्ती बहु मंडळाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## राजेशभैय्या टोपे यांच्या वाढदिवसानिमित्त पानेवाडीत भव्य 'श्रीहरी किर्तन' सोहळ्याचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी. गणेश सपकाळ/** महाराष्ट्र राज्याचे माजी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा जेष्ठ नेते ना.राजेशभैय्या टोपे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पानेवाडी येथे भव्य आणि भक्तिमय 'श्रीहरी किर्तन' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कीर्तन सोहळा रविवार,दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी रात्री ८ ते १० वाजेपर्यंत पानेवाडी (ता.घनसावंगी,जि.जालना) येथे संपन्न होणार आहे.या कार्यक्रमात सुप्रसिद्ध किर्तनकार रामान्याचार्य ह.भ.प.श्री रामराव महाराज ढोक हे श्रीहरी नामस्मरणातून भक्तांना अध्यात्मिक मार्गदर्शन करणार आहेत. या भक्तिमय सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट),भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टी तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या महाविकास आघाडीतील सर्व सन्माननीय पदाधिकारी,कार्यकर्ते तसेच घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. या कार्यक्रमाचे आयोजन सौ.दमयंतीताई राम सावंत (सदस्या,जिल्हा परिषद जालना),पानेवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच,उपसरपंच व सर्व सदस्य, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे पदाधिकारी,शालेय समिती,कै.भगवानराव सावंत सेवाभावी संस्था तसेच समस्त पानेवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.






तसेच 'राम सावंत मित्र मंडळ' आणि राणीउंचेगाव जिल्हा परिषद सर्कल यांच्या वतीने सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या श्रीहरी किर्तन सोहळ्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## संयोजन समितीच्या अध्यक्षपदी डॉ.कालिंदाताई उढाण, सचिवपदी ड.दुर्गाताई शेळके याची निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी. गणेश सपकाळ/** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त यशवंत प्रतिष्ठान,शेवगा (ता.अंबड,जि.जालना) यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या यशवंत व्याख्यानमाला २०२६ च्या संयोजन समितीच्या अध्यक्षपदी डॉ. कालिंदाताई उढाण यांची तर सचिवपदी सौ. ड.दुर्गाताई शेळके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे,अशी माहिती यशवंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ड.संजय खोरे यांनी दिली.



यशवंत व्याख्यानमालेच्या आयोजनासंदर्भात एक महत्त्वाची बैठक दि. ३ जानेवारी रोजी अंबड शहरातील सह्याद्री कोचिंग क्लासेस येथे यशवंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ड.संजय खोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.या बैठकीत यावर्षीच्या व्याख्यानमालेचे स्वरूप,नियोजन, व्याख्याते निवड,कार्यक्रमाच्या तारखा तसेच इतर आवश्यक बाबींवर सविस्तर व सखोल चर्चा करण्यात आली. या चर्चेनंतर उपस्थित सर्व सदस्यांच्या एकमताने संयोजन समितीच्या अध्यक्षपदी डॉ.कालिंदाताई उढाण व सचिवपदी ड.दुर्गाताई शेळके यांची निवड करण्यात आली.यशवंत प्रतिष्ठानच्या वतीने मागील पंधरा वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त यशवंत व्याख्यानमालेचे सातत्याने आयोजन करण्यात येत असून,या व्याख्यानमालेत महाराष्ट्रासह देशभरातील नामवंत विचारवंत,अभ्यासक व व्याख्याते उपस्थित राहून श्रोत्यांना मार्गदर्शन करतात.यावर्षी देखील यशवंत व्याख्यानमालेचे आयोजन नियोजनबद्ध व प्रभावी पद्धतीने करण्यात येणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813